**अधिकार अभिलेखाविषयक गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यामधील "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी नोंदविण्यात आलेल्या "जातीवाचक" नावांची नोंद कमी करुन सुधारीत नोंद घेण्यासंदर्भात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना दिशा-निर्देश देण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र.जमीन-२०२१/प्र.क्र.५९/ज-१अ**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ ऑगस्ट, २०२१.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र महसूल संहिता, १९६६, त्याखालील नियम महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड-४) यामधील तरतुदीनुसार राज्याच्या प्रत्येक "साझा" यामध्ये अधिकार अभिलेख विषयक विविध नोंदवहया ठेवण्यात येतात. त्यामध्ये गा .न .नं. ७ ही "अधिकार अभिलेख विषयक" नोंदवही आहे, तर गा .न .नं. १२ ही "पिक पाहणी विषयक" नोंदवही आहे. या दोन्ही गा.न.नं. नोंदवहयांच्या एकत्रित उताऱ्यास गा. न. नं. ७/१२ चा उतार असे संबोधण्यात येते. राज्यातील काही गावांमधील गा. न. नं. ७/१२ या अधिकार अभिलेखाविषयक गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यावरील शेतीचे स्थानिक नाव या सदरी "शेतीचे जातीवाचक स्थानिक नावे" असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. राज्यात सामाजिक सलोखा व सौहार्द निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मता वृध्दींगत होण्याच्या दृष्टीने अशा अधिकार अभिलेखाविषयक गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यामधील "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी नोंदविण्यात आलेल्या "जातीवाचक" नावांची नोंद कमी करुन सुधारीत नोंद घेण्यासंदर्भात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील जमिनीच्या अधिकार अभिलेखाविषयक गा. न. नं. ७/१२ उताऱ्यात "शेतीचे स्थानिक नाव" याविषयी स्वतंत्र रकाना आहे. काही गावांतील गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यातील या रकान्यात "शेतीचे जातीवाचक स्थानिक नावे" नोंदविले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे राज्यात सामाजिक सलोखा व सौहार्दपूर्ण वातावरण राहून राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने अशा गावांतील अधिकार अभिलेखातील गा. न. नं. ७/१२ च्या उताऱ्यातील "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी असलेली "जातीवाचक शेतीचे स्थानिक नाव" यांची नोंद वगळून त्याऐवजी आवश्यक असल्यास गावातील स्थानिक-भौगोलिक स्थितींशी निगडित, नदी-नाल्यांशी निगडित नावे देण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.



Scanned with OKEN Scanner

०२. कार्यपद्धती:- अशा बदलावयाच्या नावासंदर्भात नियम व अधिनियमांतील कार्यपद्धती अनुसरून संबंधित गावच्या ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन त्यास संबंधित तहसीलदाराने जिल्हाधिकारी यांची प्रथम मान्यता घ्यावी, तद्नंतर संबंधित नोंदी नियमातील तरतुदीस अनुसरुन संबंधित गा.न .नं. ७/१२ च्या "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी अद्ययावत करण्यात याव्यात.

०३. या विषयाचे महत्त्व लक्षात घेता अधिकार अभिलेख विषयक गा. न .नं. ७/१२ उताऱ्याच्या "शेतीचे स्थानिक नाव" या सदरी असलेल्या जातीवाचक नावांच्या नोंदी वगळून वरील प्रमाणे सुधारित नावांच्या नोंदी घेण्यासंदर्भात सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात "विशेष मोहीम" हाती घ्यावी. तसेच यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा संबधित जिल्हाधिकारी यांनी मासिक बैठकीत घ्यावा.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०८२५१४३३३२१८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रमेश चव्हाण)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

**१)** मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
**२)** मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
**३)** मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
**४)** मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
**५)** मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
**६)** प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,३२
**७)** महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (१) मुंबई,
**८)** महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
**९)** प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२,
**१०)** सर्व विभागीय आयुक्त,
**११)** जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
**१२)** सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी
**१३)** माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२,
**१४)** सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
**१५)** सर्व तहसिलदार/ सर्व तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
**१६)** सर्व सहसचिव /उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
**१७)** "ज" समूहातील सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
**१८)** निवडनस्ती, कार्यासन-ज-१ अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.



Scanned with OKEN Scanner